IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 Online ISSN 2278-8808
AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

SRJIS
www.srjis.com

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL - JUNE,2021, VOL - 10, ISSUE-47

Indian Social & Research Foundation Akola ,

## ARTS COLLEGE MALKAPUR, AKOLA

( Accredited By NAAC With "B" Grade)
Department of Music & IQAC Organizing

In Collaboration with
**Sharda Sangeet - Kala Academy Indore (M.P.)**

**One Day National E- Conference**

## Contribution of Modern Technology in Globalization & Development of Music & All Interdisciplinary Subjects

**Editor-In-Chief**
**Asso. Prof. Dr. Yashpal D. Netragaonkar**
*MIT World Peace University School of Education,*
*Kothrud, Pune*

**Editor**
**Dr. Gitali S. Pande**
*Principal , Head of Music Department,*
*Arts College Malkapur, Akola (M.S.)*

**Co- Editor**
**Dr. Sunil B. Patake**
*Department of Music Arts College*
*Malkapur, Akola (M.S.)*

**SCHOLARLY RESEARCH JOURNALS**
*S. No. 5+4/5+4, TCG'S, Saidatta Niwas, D-wing, Ph- II, 2nd Floor,*
*F. No. 104, Nr. Telco Colony & Blue Spring Society,*
*Dattanagar, Jambhulwadi Road, Ambegaon (BK), Pune - 411046,*
*Website: www.srjis.com*

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| 24. झाडीपट्टीतील संगित लोकवांङ्मय अदृभूत ठेवा<br>प्रा. शरद गजभीये | 606-616 |
| 25. मराठी भाषेच्या जागतिकीकरणामध्ये व विकासामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचे योगदान<br>प्रा डॉ हरिदास देविदास आखरे | 617-623 |
| 26. जागतिकीकरणामध्ये भारतीय संगीताच्या प्रचार, संवर्धन आणि सादरीकरणावर झालेला आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव<br>अस्मिता चंद्रहास सेवेकरी | 624-631 |
| 27. संगीत शिक्षणाचे बदलते स्वरुप व तंत्रज्ञान<br>डॉ. गीताली पांडे | 632-634 |
| 28. आधुनिक तंत्रज्ञानातील माध्यमांचा संगीत शिक्षण पद्धती व विकासातील अंतर्भाव<br>प्रा. वंदना म. देशमुख | 635-637 |
| 29. आधुनिक तंत्रज्ञानामुळे भारतीय संगीत क्षेत्रात झालेले परिवर्तन व वैश्विकरण<br>सोनाली आसरकर (शिलेदार) | 638-641 |
| 30. वैश्विकरण – संगीत के विकास एवं प्रचार-प्रसार मे तंत्रज्ञान का प्रयोग<br>डॉ. योगिनी भास्करराव सोनटक्के | 642-648 |
| 31. गृहअर्थशास्त्र, जागतिकीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञान<br>डॉ. जिजा राऊत | 649-653 |
| 32. कोविड–१९ काळातील डिजिटल ग्रंथालयाची भूमिका संधी आणि व्याप्ति<br>डॉ– स्वाती शंभरकर | 654-661 |
| 33. मातृभक्त विष्णुदास माहूरकरांच्या साहित्यातील संगीत व सामाजिकता<br>डॉ. मनोजकुमार धोंडोपंत देशपांडे | 662-671 |
| 34. व्यायाम करना-या आणि न करना-या विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेचे तुलनात्मक अध्ययन<br>प्रा. डॉ. चंद्रशेखर बाबासाहेब कड्ड | 672-679 |
| 35. कोविड –१९ चा कृषी अर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>प्रा. एस. के. इंगळे | 680-683 |
| 36. संगीताच्या विकासात आधुनिक तंत्रज्ञानाचे योगदान<br>डॉ. मृणाल प्रभाकरराव कडू | 684-687 |

Scanned with OKEN Scanner

Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,
Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL SPECIAL ISSUE APR-MAY, 2021, VOL- 8/65

# झाडीपट्टीतील संगित लोकवांङ्मय अद्भूत ठेवा

**प्रा. शरद गजभीये (संगित विभाग)**

*एम. ए. एम. फिल., नेट, डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, पवनी, जि. भंडारा*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना :-

महाराष्ट्रात वेगवेगळया चालीरितीवरुन वेगवेगळे वांङ्मय वेगवेगळया विभागामध्ये निर्माण झाले. जसे कोकणातील कोकणी वांङ्मय, मराठवाडा खानदेशातील खानदेशी वांङ्मय, वऱ्हाडात वऱ्हाडी वांङ्मय त्याच प्रमाणे झाडेपट्टीतील झाडीपट्टी वाङ्मय निर्माण झाले. महाराष्ट्रात असंख्य जाती आहेत. त्यांच्यातून त्यांच्या रितीरिवाजानुसार जन्म, लग्न, मृत्यु, त्यांच्या देव-देवता इत्यादी प्रसंगानुरुप वेगवेगळी लोकगीते निर्माण झाली. उदा. आदिवासी समाजातील आदिवासी गीते, बंजारा समाजातील बंजारी गीते, धनगर समाजातील धनगरी गीते इत्यादी निर्माण झाली. याव्यतिरिक्त काही अशी गीते आहेत की, ज्यामध्ये वेगवेगळया जमातीतील लोक एकत्र येऊन लोकगीते निर्माण झाली. यामध्ये दंडार, तमाशा, गोंधळ, भारुड, भजन, किर्तन, पोवाडा, इत्यादी. त्याचप्रमाणे नाटक आणि लावणी यामध्ये सुद्धा अनेक समाजातील जमातीतील लोक एकत्र येऊन याचे सादरीकरण केले जाते. हा प्रकार सर्वच स्तरातील लोकांमध्ये आवडीचा, मनोरंजनाचा दिवसभर शारिरीक कष्ट करुन जिवनात उत्साह, शक्ती निर्माण करण्याचा प्रकार दिसून येतो. अशा प्रकारे झाडीपट्टीतील गीतांचा परिचय करुन घेणे, इथल्या वांङ्मयाचा परिचय करुन घेणे हे विषयानुरुप महत्वाचे आहे.

## झाडीपट्टीतील लोकभावनेचा अभ्यास :-

झाडीपट्टीतील लिखित व अलिखित खुप मोठे वांङ्मय निर्माण झाले आहे. या वांङ्मयाचा कल गद्यापेक्षा लोक संगित पद्य या भागाकडे अधिक दिसून येतो. यामध्ये दळण-कांडण, धुणे, पाणी, शेतात काम करणे, इत्यादीशी त्याचा संबंध असतो. लोकगीतांना एक प्रकारची लय असते. स्वरांवर सुरांचे प्रभुत्व असते. ते गेय्य व तालावर आधारलेले असते. यातुन इतिहासाचे शिक्षण व समाज घडविण्याचे काम लोकगीते करतात. लोकगीते ही ग्रामीण व जाणपद गीते असतात. यामध्ये चार चरणांची कडवे असतात. पुनरावृत्ती असते. धृपदाला फार महत्वाचे स्थान असते. वृत्ताचे बंधन नसते. निरर्थक शब्दांची योजना केलेली असते. लोकगीतात लवचिकता असते.

## लोकगीताचे प्रकार :-

### अ) रचना विशेषानुसार :-

१) विधी गीते - जन्म, मृत्यू, विवाह, उपनयन, इत्यादी

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

Scanned with OKEN Scanner